शांतपणे विचार करून घेतलेले निर्णय नेहमी योग्य ठरतात.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | बुधवार ५ मार्च २०२५ | अंक ८६ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु







# सरपंच देशमुख हत्येचे फोटो समोर येताच जिल्हा पेटला

# बीड,केज,अंबाजोगाई,वडवणी,धारूर कडकडीत बंद

बीड : संतोष देशमुख यांच्या हत्येचे फोटो व्हायरल झाल्यानंतर राज्यभरात संतापाची लाट उसळली आहे. बीडमध्ये आज स्वयंघोषित कडकडीत बंद पुकारण्यात आला आहे. संतोष देशमुख यांच्या समर्थनार्थ युवकांनी बीड शहरातील रॅली काढून बीड बंद यशस्वी करण्याचे आवाहन केले.कोणताही अनुचित प्रकार होऊ नये म्हणून, पोलिसांनी बीडसह मस्साजोग गावात बंदोबस्त वाढवला आहे.संतोष देशमुख यांच्या हत्येचे दोषारोपपत्र मएसआयटीफ्ने विशेष न्यायालयात दाखल केले. यात संतोष देशमुख यांच्या हत्येचे फोटो आणि व्हिडिओ जोडण्यात आले आहेत. यानंतर हे फोटो आणि व्हिडिओ काल रात्री समाज माध्यमांवर व्हायरल झाले. त्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रात संतापाची







लाट उसळली आहे. याचबरोबर धनंजय मु डे यांच्यावर मंत्रिपदाच्या राजीनाम्याचा दबाव वाढला होता.संतोष देशमुख यांच्या हत्येचे फोटो व्हायरल झाल्याचे पडसाद पहिले उमटले ते, बीड जिल्ह्यात! संतोष देशमुख यांच्या समर्थनार्थ आणि मारेकऱ्यांच्या निषेधार्थ बीडमध्ये नागरिक एकवटले होते. यावेळी नागरिकांमध्ये संतप्त प्रतिक्रिया होत्या.बीड जिल्हा बंदची आज हाक देण्यात आली आहे. बीडच्या छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये बीडचे नागरिक एकत्र जमून घोषणाबाजी करण्यात आली. उपमुख्यमंत्री अजित पवार, धनंजय मुंडे, वाल्मिक कराड, सुदर्शन घुले यांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्याती आली. तर केज अंबाजोगाई वडवणीमध्ये नागरिकांनी टायर जाळून निषेध व्यक्त केला. आरोपींना फाशी देण्याची मागणी करण्यात येत आहे. तर काही ठिकाणी धनंजय मुंडे आणि आरोपींचे फोटो जाळून निषेध नोंदवला. आरोपींना फाशी द्या, धनंजय मुंडे यांच्यावर खंडणीसह हत्येचा गुन्हा दाखल करा, अशी आक्रमक मागणी आंदोलकांनी केली.संतोष देशमुख हत्येच्या निषेधार्थ केजमध्ये नागरिक आक्रमक झाले. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या होऊन आता जवळपास तीन महिन्यांचा कालावधी उलटला असून अजूनही एक मारेकरी बाहेर मोकाट फिरतोय. तर बाकीच्या आरोपींना मोक्का लावण्यात आला आहे. या निर्घृण हत्येने संपूर्ण राज्य हादरलं आहे. संतोष देशमुख यांची अत्यंत क्रूर पद्धतीने हत्या करण्यात आली. याच दरम्यान काल रात्री देशमुख यांच्या हत्येचे काही फोटो आणि व्हिडिओ समोर आले आहेत. अत्यंत क्रूरतेने, आणि बेदमपणे मारहाण करून देशमुख यांचा जीव घेण्यात आला.

## महावितरणाचा कणा हा जनमित्र आहे :- संदीप चाटे (कार्यकारी अभियंता ) अंबाजोगाई महावितरण विभागातर्फे लाईनमन डे उत्साहात साजरा

बीड /अंबाजोगाई प्रतिनिधी:- जनमित्र कर्मचाऱ्यांना विरंगुळा मिळावा म्हणून संगीत रजनी व सुरूची भोजनाचे आयोजन ०४ मार्च हा ङ्गलाईनमन डेङ्ग म्हणून साजरा केला जातो,याच लाईनमन डे चे औचित्य साधून सर्व जणमित्रांना कर्मचाऱ्यांना विरंगुळा मि ळावा म्हणून संदीप चाटे साहेब यांच्या संकल्पनेतून महावितरण अधिकाऱ्यांच्या वतीने संगीत रजनी व सुरुची भोजनाचे आयोजन अंबाजोगाई येथील मानवलोक ॲड भगवानदासजी लोहिया कल्याण मंडपमब या प्रशस्त परिसरात आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी अंबाजोगाई महावितरण विभागाचे कार्यकारी अभियंता श्री संदीप चाटे साहेब हे होते, तसेच कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून श्री बोबडे साहेब, श्री कानडे साहेब, श्री दत्ताभाऊ गुट्टे साहेब, श्री गीते सर, श्री जाधव सर ,कराड सर, नाकाडे सर ,आमले सर, मुंडे सर ,महिला प्रतिनिधी सहाय्यक अभियंता श्री नागरगोजे मॅडम, लेखा विभागाचे काळे सर ,किशोर ढगेसर ,देशमुख मॅडम व इतर अधिकारी कर्मचारी लाईनमन डे कार्यक्रमाला उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांचे स्वागत व मइतनी शक्ती हमे दे ना दाताफ या प्रार्थनेने झाली. नंतर प्रत्येक शाखेतील प्रत्येक कर्मचारी जनमित्र यांचा पुष्पगुच्छ व शुभेच्छापत्र देऊन सत्कार करण्यात आला.सुरक्षा विषयक शपथङ्ग सर्व



अधिकारी कर्मचाऱ्यांनी घेतली. कार्यक्रमाच्या वेळी विरंगुळा म्हणून नारायण चाटे संगीत रजनी प्रस्तुत यांच्यावतीने गीत गायन मनोरंजनाचा कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमात जनमित्र श्री सुनील दहिफळे, अर्जुन राव मुंडे, अशोक मुंडे इतर कर्मचाऱ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यानंतर प्रमुख पाहुण्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय भाषण श्री संदीप चाटे सर यांनी केले आपल्या भाषणात महावितरणाची कर्तव्यरूपी सेवा करत असताना येथे चुकीला माफी नाही त्यामुळे काळजीपूर्वक आपण लाईट संदर्भात काम करणे आवश्यक आहे, तसेच काळजी घेणे फार आवश्यक आहे, जनमित्र हा महावितरण चा कणा आहे त्यामुळे तुमच्यावर फार मोठी जिम्म ेदारी ती तुम्ही काळजीपूर्वक पार पाडणे आवश्यक आहे याचे भान आपण ठेवले पाहिजे.जणमित्र यांनी विद्युत वाहिनीवर काम करताना एकदा आपल्या कुटुंबाची आठवण काढूनच काम करावे म्हणजे आपण काळजीपूर्वक काम कराल अशी अपेक्षा चाटे सर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात व्यक्त केली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किशोर फड यांनी केले तर आभार लेखा विभाग अधिकारी काळे सर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी अधिकारी सर्वश्री बोबडे सर, कानडे सर, गीते सर, काळे सर, जाधव सर ,कराड सर, श्री डेंगे व इतर अधिकारी कर्मचारी यांनी परिश्रम घेतले व कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडला कार्यक्रमाला महिला कर्मचारी वर्गाची उपस्थिती आवर्जून होती.

## सिरसाळा कडकडीत बंद !व्यापाऱ्यांनी ही आपापली दुकाने बंद ठेऊन सहकार्य केले

सिरसाळा- अतुल बडे सकाळपासूनच सिरसाळा येतील नागरिक आक्रमक होताना दिसून येत होते. रात्रीपासूनच बीड बंदची हाक देणारी पोस्ट सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाल्याचे दिसून येत होत्या मंगळवारी



सकाळपासून बंदच्या अनुषंगाने बाजारपेठा बंद होते. बंद मध्ये दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात येत होती. सिरसाळा येथील व्यापाऱ्यांनी उत्स्फूर्तपने आपापली दुकाने बंद ठेवून बंदला सहकार्य केले . तर सामाजिक संघटनांनी रस्त्यावरती उतरून बंदसाठी आवाहन केले होते.सरपंच संतोष देखमुख हत्येचे फोटो व्हायरल सोशल मीडियावर व्हायरल झाले, सरकारची प्रतिमा मलीन होताना दिसतेय अस सर्वत्र बोलल जात आहे. त्यामुळे आता धनंजन मुंडे राजीनामा देणार का हा प्रश्न उपस्थित होत होता. धनंजय मुंडे यांच्या पीएने सागर बंगल्यावर आपला राजीनामा दिला.सरपंच संतोष देखमुख हत्येचे फोटो व्हायरल सोशल मीडियावर व्हायरल झाले. याच पार्श्वभूमीवर परळी तालुक्यातील मोठी बाजारपेठ समजले जाणारे सिरसाळा हे मोठं गाव कडकडीत बंद करण्यात आला आहे.

## कै. संतोष देशमुख, महादेव मुंडे व सोमनाथ सूर्यवंशी यांना कॅन्डल मार्च काढून सामूहिक श्रद्धांजलीचे आयोजन




परळी (वार्ताहर) मस्साजोगचे सरपंच कै संतोष अण्णा देशमुख, महादेव मुंडे व सोम नाथ सूर्यवंशी यांना सामूहिक श्रद्धांजली वाहण्यासाठी कॅन्डल मार्च काढून सामूहिक श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी परळी शहर व तालुक्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन सकल मराठा समाजाच्या वतीने करण्यात आले आहे. परळी वैद्यनाथ येथे बुधवार दिनांक ५ मार्च २०२५ रोजी सायंकाळी ०६.०० वाजता जिजामाता उद्यान येथील जिजाऊंच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून कॅण्डल मार्चला सुरुवात होईल पुढे राणी लक्ष्मी टावर, मोंढा मार्केट, स्टेशन रोड मार्गे , बस स्टॅन्ड ते छत्रपती शिवाजी महाराज चौक असा मार्ग असेल त्यानंतर कॅन्डल मार्च छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे पोहोचल्यानंतर त्याठिकाणी सामूहिक श्रद्धांजली वाहण्यात येईल तरी या कॅन्डल मार्च व सामूहिक श्रद्धांजली वाहण्यासाठी परळी शहरातील व तालुक्यातील सर्व महिला, पुरुष, तरुण लहान थोर मंडळींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन सकल मराठा समाजाच्या वतीने करण्यात आले आहे.

## स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना तात्काळ फाशीद्या घोषणाबाजी करत पाटोदा कडकडीत बंद

पाटोदा प्रतिनिधी:- मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचे क्रूर पद्धतीचे फोटो समोर आल्यानंतर आज बीड जिल्हा बंदची हाक देण्यात आलेली आहे. याच बंदला प्रतिसाद देत पाटोदा तालुका कडकडीत बंद ठेवून छत्रपती शिवाजी महाराज चौक ते तहसील कार्यालयावर निषेध मोर्चा काढण्यात आला या निषेध मोर्चात समाज बांधव आक्रमक होऊन प्रचंड घोषणाबाजी




करण्यात आली. मस्साजोगचे माजी सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचा तपास पूर्ण झाल्यानंतर सीआयडीने आरोपपत्र सादर केलं. या आरोपपत्रात संतोष देशमुख यांच्या हत्येच्या वेळी आरोपींनी काढलेले १५ व्हिडिओ आणि ८ फोटो देखील आहेत. त्यातून अत्यंत क्रूर पद्धतीने संतोष देशमुख यांचा छळ करून त्यांना मारण्यात आल्याचं बघायला मिळत आहे. हे सगळे फोटो सोशल मिडियावर व्हायरल झाल्यानंतर आज पाटोदा बंदची हाक देण्यात आलेली आहे. त्याच पार्श्वभूमीवर पाटोदा शहरात आज समाज बांधव आक्रमक होत बाजारपेठ बंद केली आहे. यावेळी धनंजय मुंडे आणि वाल्मिक कराड यांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करत सर्व आरोपींना फाशीची शिक्षा करण्यात यावी अशी मागणी या तरूणांकडून करण्यात आलेली आहे.

# धनंजय मुंडे यांचा राजीनामा होताच मनोज जरांगे यांची मोठी मागणी

## धनंजय मुंडे ३०२ मध्ये आहे म्हणजे आहे



जे झालं चांगलं झालं. अजित पवार आणि फडणवीस यांची नियत महत्त्वाची आहे. एवढी मोठी घटना होऊन मग्रुरी जशीच्या तशी आहे. एवढी मोठी घटना झाल्यावर त्यांना पश्चात्ताप होणार नाही. असं करून हे सर्वांच्या नजरेतून उतरणार आहे. एक दिवस यांची लंका डुबणार. यांची मग्रुरी आणि मस्तीखोरामुळे यांची लंका पाण्यात डुबणार. हे लयाला जाणार आणि पाताळात जाणार आहेङ्ग अशी टीका मनोज जरांगे पाटील यांनी केली. ङ्गआता सरकारवरील नामुष्की ओढवली, मी या या स्वरूपाचा असा राजीनामा देतो. तसं बोलत नाही तो. आताही तीच मग्रुरीची भाषा आहे. माझं दुखतंय मी राजीनामा देतोय, उपचारासाठी. पदाचा आणि उपचाराचा काय संबंध? बरं झालं. मुख्यमंत्री आणि अजितदादांना कळालं माजोरडा आहे म्हणून. महाराष्ट्रातील मराठ्यांनाही कळायला हवं होतं. मराठ्यांनी सावध राहून त्यांना मोठं करू नये. मराठ्यांनी हातचं राखून काम केलं पाहिजेङ्ग असं मनोज जरांगे पाटील म्हणाले. सर्व चार्जशीट झाल्यावर राजीनामा दिला. त्या आधी द्यायला हवा होता. तू मारल्यासारखं कर, मी रडल्यासारखं करतो असं आहे. राजकीय गुंड मित्र वाचवण्याचं काम केलं. उशिरा का असेना पण अजितदादा आणि फडणवीस यांचे आभार मानले पाहिजे. त्यांनी लाथ घालून हाकललं. आपण मागणी केली. त्यांनी नैतिकता म्हणा आणि संस्कार म्हणा, आम्ही काल मागणी केली आज राजीनामा दिला. हे माज मस्ती करून आपलेच लोकं पाताळात घालणारङ्ग असं मनोज जरांगे पाटील म्हणाले. ङ्गटोळीचा लोक नायनाट करणार. लोक त्यांना राहू देणार नाही. यांचा माजोरडापणा राहणार नाही. आपण मोठं झाल्यावर मध्यस्थीच्या भूमिकेत असलं पाहिजे. हे पैसेवाले झाल्यावर मस्तीखोर झाले. यांचा उलटा खेळ आहे. यांची अर्धी टोळी आत गेली. धनंजय मुंडे ३०२ मध्ये आहे म्हणजे आहे. मी फडणवीस आणि अजित पवार यांच्याकडे मागणी करतो की पुरवणी तपास करा. पुरवणी तपासात सर्वांना सहआरोपी करा. धनंजय मुंडेंनाही सहआरोपी करा. दोन ते तीन महिन्यात प्रकरण संपवा. या सर्वांना फाशी द्याङ्ग अशी मागणी मनोज जरांगे पाटील यांनी केली.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
बुधवार ५ मार्च २०२५
https://lokaarambh.com



# संपादकीय

## ट्रम्प यांची दमदाटी

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प, उपाध्यक्ष जे. डी. व्हान्स यांनी युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांना व्हाईट हाऊसमधील ओव्हल ऑफिसमध्ये माध्यमांच्या उपस्थितीत दमदाटी केल्यामुळे सारे जग सिमित झाले आहे. शुक्रवारी रात्री चर्चेदरम्यान जोरदार वादावादी झाली. त्यानंतर झेलेन्स्की यांनी युक्रेन अमेरिका दरम्यानच्या प्रस्तावित खनिज करारांवर स्वाक्षरी न करताच व्हाईट हाऊस सोडले. दोन राष्ट्रप्रमुखांमध्ये द्विपक्षीय चर्चेवेळी अशा प्रकारे कॅमे यांसमोर शाब्दिक चकमक होण्याची ही बहुधा पहिलीच वेळ असावी. झेलेन्स्की व्हाईट हाऊसमध्ये दाखल झाले तेव्हा स्वतः ट्रम्प यांनी प्रवेशद्वारावर त्यांचे स्वागत केले होते. ज्या उद्देशाने झेलेन्स्की अमेरिकेत आले होते तो सफल झाला नाहीच. उलट आता रशिया विरुद्धच्या युद्धात अमेरिका युक्रे नला पुरवत असलेली मदत सरसकट थांबवण्याची शक्यता नाकारता येत नाही. यामुळे युक्रे न युद्धात संभाव्य शस्त्रविराम तसेच सद्यस्थितीत युक्रेनचे संरक्षण करण्याची जबाबदारी झेलेन्स्की आणि त्यांचे युरोपियन सहकारी यांच्यावर येऊन पडली आहे. व्हाईट हाऊसमध्ये पत्रकार परिषदेस सुरुवात झाली तेव्हा प्रारंभी ट्रम्प यांनी युक्रेन युद्धविरामाच्या प्रयत्नांना लवकर यश येईल, असे सांगितले. झेलेन्स्की यांनीही काही प्रश्नांना उत्तरे दिली; पण युद्धविराम आणि पुतीन या मुद्यांवर असलेले तीव्र मतभेद समोर येतील, अशी शक्यता दिसत होती. हे मतभेद उकरून काढण्याचे काम उपाध्यक्ष व्हान्स यांनी केले. कोणत्या मुत्सद्देगिरीविषयी आपण बोलत आहात? असा सवाल झेलेन्स्की यांनी व्हान्स यांना केला तेव्हा तुमचा पवित्रा अनादरजनक असल्याचा आरोप व्हान्स यांनी केला. झेलेन्स्की स्वतःचा आणि युक्रेनचा बचाव करू लागले. आमच्यासारखी वेळ कधीतरी तुमच्यावरही येऊ शकते, असे ते म्हणाले. त्यावर शांत बसलेले ट्रम्पही भडकले. तुम्ही अत्यंत वाईट परिस्थितीमध्ये आहात हे विसरू नका. आम्ही नसतो तर दोन आठवड्यात तुम्ही संपला असता, असे सांगत ट्रम्प आणि व्हान्स यांनी दमदाटी केली. युक्रे नमधील खनिज समृद्ध प्रदेशात उत्खननाचा परवाना अमेरिकेला देणे आणि यातील ५० टक्के खनिजाच्या बदल्यात अमेरिकेकडून सुरक्षा हमी मिळवणे हा झेलेन्स्की यांच्या भेटीचा मूळ उद्देश होता. अमेरिकेकडून शस्त्रास्त्रे मिळवत असताना युद्धविरामाच्या दिशेने ठोस पावले उचलणे हे विषयदेखील भेटीच्या कार्यक्रम पत्रिकेवर होते. ट्रम्प हे सातत्याने पुतिन यांची बाजू घेताना युक्रे नलाच युद्धाबद्दल जबाबदार धरू लागले होते. त्याबद्दल ट्रम्प यांची थेट भेट घेऊन त्यांचे शंकानिरसन करण्याचा झेलेन्स्की यांचा हेतू होता. या भेटीची दृष्ये पाहिल्यानंतर एक शक्यता मनात येते ती म्हणजे झेलेन्स्की यांना दमदाटी करणे आणि त्यांना बचावात्मक पवित्रा घ्यायला भाग पाडणे हे डावपेच पूर्वनियोजित असावेत. या प्रकरणी उपाध्यक्ष व्हान्स यांनी पुढाकार घेतला. कारण त्यांनीच पहिल्यांदा झेलेन्स्की यांना चिथावणी दिली आणि त्यांना खिंडीत गाठण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या सापळ्यात झेलेन्स्की सापडले, असे अनेक विश्लेषकांचे मत आहे. झेलेन्स्की यांची मुत्सद्देगिरी कमी पडली, असेही म्हटले जात आहे. युद्धविरामासाठी ट्रम्प मोठी भूमिका बजावतील, अशी अपेक्षा ठेऊन गेलेल्या झेलेन्स्की यांना प्रत्यक्षात जाहीर दमदाटीला सामोरे जावे लागले. त्यानंतर त्यांनी चर्चा अर्धवट सोडली आणि अमेरिकी जनतेचे आभार मानून तेथील उर्वरित कार्यक्रम रद्द करून निघून जाणे पसंत केले. ट्रम्प आणि झेलेन्स्की यांच्यातील शाब्दिक चकमकीची जगभर चर्चा सुरू आहे. केवळ झेलेन्स्की यांच्या संदर्भात असे घडले असे नाही. गत सुमारे ४० दिवसांत ट्रम्प यांचे ५ देशांच्या प्रमुखांशी खटके उडाले आहेत. ट्र म्प यांनी दुस-यांदा अध्यक्षपदाची शपथ घेतल्यानंतर त्यांची पहिली भेट इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेत्यानाहू यांच्याशी झाली होती. ट्रम्प यांच्या मनात काय आहे, याचे अंदाज बांधले जात आहेत. ट्रम्प यांना जगभरात आपली ओळख सुपरमॅन अशी बनवायची आहे. सध्या अमेरिकेच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देण्याचा मानस आहे. अमेरिकेला अधिक बळकट करायचे आहे. त्यासाठी सत्तेवर येताच त्यांनी ङ्गमेक अमेरिका ग्रेट अगेनफ असा नारा दिला होता. त्यांना आपल्या लोकांसमोर स्वतःची प्रतिमा (इमेज) बनवायची आहे. ट्रम्प सध्या रोज नवे आणि बेधडक निर्णय घेत आहेत. त्यांचा एक निर्णय अमेरिकन लोकांनाही धक्कादायक ठरला. शुक्रवारी रात्री त्यांनी अमेरिकेच्या सर्वोच्च लष्करी अधिका-याला तडकाफडकी हटवले त्यामुळे लष्कर आणि अधिका यांचे धाबे दणाणले आहे. युक्रेनवर रशियाने थेट हल्ला करून युद्धाला सुरुवात केली. त्या वेळी लोकशाही मानणा-या देशाला वाचवण्यासाठी अमेरिका युक्रेनला सर्व प्रकारची मदत करत होता. ती मदत आता वसूल करण्याचा ट्रम्प यांचा प्रयत्न आहे. युक्रेनच्या खनिज संपत्तीवर त्यांचा डोळा आहे. आता युरोपीय देशांना युक्रे नच्या पाठीशी राहावे लागणार हे खरे असले तरी युरोप आर्थिकदृष्ट्या अडचणीत सापडला आहे. अमेरिकेने युक्रेनला आर्थिक व लष्करी मदत केली नसती तर हे युद्ध केव्हाच संपले असते. आता तोच पवित्रा ट्रम्प आर्थिक कारणांसाठी घेत आहेत. युद्ध सुरू झाले तेव्हा रशियाला शह देण्यासाठी अमेरिकेने युक्रे नला मदत केली होती. आता ट्रम्प यांचा प्राधान्यक्रम वेगळा आहे त्यामुळे ते युक्रे नवर दबावतंत्राचा वापर करत आहेत. अमेरिका युक्रे नला मदत करणे थांबवणार का? असा प्रश्न निर्माण झाला आहे. ट्रम्प यांनी झेलेन्स्की यांच्यासाठी चर्चेचा मार्ग पूर्णपणे बंद केलेला नाही; परंतु आता चर्चा म्हणजे आपल्याला हवे तेच करवून घेणे ही ट्रम्पनिती आहे. युद्धोत्तर सुरक्षा हमी अमेरिकेकडून मिळेल का? याबाबत हट्टी, दूराग्रही ट्रम्प काहीच स्पष्टपणे बोलत नाहीत.

# म्हणूनच लोक नमितातार्इ मुंदडांवर प्रेम करतात..!

केज विधानसभा मतदारसंघाच्या विद्यमान आमदार नमिता अक्षय मुंदडा यांचा आज वाढदिवस. सर्वप्रथम, त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा..! अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असल्याने त्या सध्या मतदारसंघात नसल्या, तरी त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव निश्चितच होणार आहे. केज, अंबाजोगाई, नेकनूर तसेच इतर प्रमुख ठिकाणी कार्यकर्त्यांनी शुभेच्छांचे बॅनर लावलेले दिसत आहेत. वाढदिवस म्हणजे जीवनातील एक वर्ष मागे पडले, असे जरी असले, तरी तो आत्मपरीक्षणाचा आणि अवलोकनाचा दिवसही असतो. केज मतदारसंघाच्या राजकारणात मुंदडा घराण्याची सून म्हणून त्यांच्या राजकीय प्रवासाची सुरूवात झाली. मात्र, स्व.विमलताई मुंदडा यांच्या पावलावर पाऊल ठेवत त्यांनी अल्पावधीतच सामान्य लोकांची मने जिंकली. मनमिळावू आणि शांत स्वभाव, सोज्वळ वागणं - बोलणं, अंगी असलेली नम्रता या गुणांमुळे त्या खर्या अर्थाने भारतीय स्त्री संस्कृतीला शोभतात. आमदार असल्याचा किंचितही अहंकार त्यांच्या स्वभावात नाही. सर्वसामान्य लोकांमध्ये मिसळून राहणे, संवादकौशल्य आणि प्रत्येकाची अस्थेवाईक चौकशी करणे या सद्गुणांमुळे केज मतदारसंघातील सर्व जाती धर्मांचे लोक त्यांच्यावर प्रेम करतात. याच प्रेमाच्या बळावर त्या सलग दुसर्‍यांदा आमदार म्हणून निवडून आल्या. एका वाक्यात सांगायचे तर, त्यांनी मागील पाच वर्षांत विकासाच्या रूपाने जणू काही प्रयागराजच्या कुंभमेळ्यातून गंगाच आणली, असे म्हणणे वावगे ठरणार नाही. मुंदडा घराण्याची सून म्हणून त्या आल्या, तेव्हाच मतदारसंघाचे भविष्यातील नेतृत्व त्यांच्या हातात जाणार, याची चाहूल लागली होती. स्व.डॉ.विमलताई मुंदडा यांनी तब्बल बावीस वर्षे मतदारसंघाचे नेतृत्व केले आणि जनसेवा हेच आपले ध्येय ठेवले. त्यांच्या निधनानंतर केवळ कुटुंबाचीच नव्हे, तर संपूर्ण मतदारसंघाची जबाबदारी आमदार नमितातार्इंनी समर्थपणे स्वीकारली. मुंबईसारख्या महानगरातील शिक्षण घेतलेल्या एका मुलीने ग्रामीण भागात स्वतःचे वेगळे अस्तित्व निर्माण करणे सोपे नव्हते. मात्र, भाजपा नेते नंदकिशोर मुंदडा आणि युवा नेते अक्षयभैय्या यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी एक एक पाऊल सावधपणे टाकत सासूबार्इंच्या वारशाला योग्य न्याय दिला. सुरूवातीला राष्ट्र वादी काँग्रेसमध्ये काम केल्यानंतर २०१९ मध्ये पंकजाताई मुंडे यांच्या पुढाकाराने त्या भाजपात आल्या. त्यानंतर झालेल्या निवडणुकीत त्या केज विधानसभा मतदारसंघातून निवडून आल्या. त्यावेळी महाविकास आघाडी सरकारच्या काळात विकासकामांसाठी निधी मिळविण्यात त्यांना अडचणी आल्या. मात्र, शिंदे फडणवीस सरकार आल्यानंतर अवघ्या अडीच वर्षांत त्यांनी केज मतदारसंघासाठी दोन हजार कोटी रूपयांपेक्षा अधिक निधी आणला. या निधीतून अंबाजोगाईच्या शहरात सिमेंट रस्त इतके सुंदर झाले की, गल्ली बोळातदेखील अभूतपूर्व बदल झाले. मअसा विकास न भूतो न भविष्यति..!फ असंच म्हणावं लागेल. यासोबतच त्यांनी अंबाजोगाई शहराचा चेहरामोहरा बदलण्यासाठी विशेष प्रयत्न केले. नगरपरिषदेच्या उद्यानांचा विकास, योगेश्वरी मंदिर तीर्थक्षेत्र, आद्यकवी मुकुंदराज यांच्या वास्तूंचा विकास, हत्तीखाना आणि इतर ऐतिहासिक स्थळांचे पुनरूज्जीवन अशा विविध उपक्रमांत त्यांचा पुढाकार आहे. मतदारसंघातील रस्ते, विद्युतपुरवठा, कृषी वीज, रूग्णालये, बंधारे, सर्वधर्मीय देवस्थानांची पुनर्बांधणी आदी विकासकामे वेगाने सुरू आहेत. नुकतेच त्यांनी कृषी तंत्र विद्यालयातील वसतिगृहांसाठी ३० कोटी रूपयांचा निधी आणला आहे. अंबाजोगाई शहरातील पाणीपुरवठा प्रश्नासाठी त्यांनी २०० कोटी रूपयांची योजना मंजूर करून आणली, काळवटी साठवण तलावाची उंची वाढवण्याचा प्रयत्न केला आणि मतदारसंघातील अनेक मूलभूत सुविधा सक्षम करण्यासाठी प्रयत्नशील राहिल्या. नमिताताई या स्वतः आर्किटेक्ट असल्याने विकासकामांमध्ये त्यांची विशेष आस्था आहे. फक्त निधी मिळविणे नव्हे, तर त्या कामांची गुणवत्ता तपासणं आणि योग्य देखरेख करणं हा त्यांचा स्थायीभाव आहे. कोणतीही विकासकामे दर्जेदार असावीत, याकडे त्यांचे लक्ष असते. भ्रष्ट शासकीय अधिकार्‍यांना जाब विचारून त्यांनी पारदर्शक प्रशासनाची गरज अधोरेखित केली. त्यांचे राजकीय जीवन हे सकारात्मक विचारधारेचे आहे. द्वेष, कट्टरता किंवा भेदभाव न करता सर्वांना सोबत घेऊन काम करण्यावर त्यांचा भर असतो.

त्यामुळेच केज मतदारसंघातील जनतेने त्यांना पुन्हा एकदा निवडून दिले. विधानसभेतही त्यांनी ऊसतोड कामगार, शेतकरी, क्रीडा, रस्ते, आरोग्यसेवा यांसारख्या विषयांवर प्रभावीपणे आवाज उठवला आहे. राजकारणात पारदर्शकता आणि जनसेवा या दोन बाबींवर त्यांचा कटाक्ष असतो. आमदार असूनही त्यांच्या वागण्यात गर्व नाही. विकासाची संकल्पना आणि निधी कसा आणायचा याचा त्यांना परिपूर्ण अभ्यास आहे. युवा नेते अक्षय मुंदडा त्यांना खंबीर साथ देत असून, शासकीय कामांचा पाठपुरावा करण्यासाठी त्यांची विशेष मदत होते. त्यांच्या नेतृत्वाची खासियत म्हणजे कुणाचाही द्वेष नाही, फक्त सकारात्मक भूमिकेतून विकासासाठी काम करणे.. त्यामुळे पक्षातील वरिष्ठ नेते माननीय मंत्री महोदया ना.पंकजाताई मुंडे, माजी खासदार डॉ.प्रितमताई मुंडे यांच्यासह मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याशी त्यांचे अतिशय चांगले संबंध आहेत. त्यामुळे शासकीय योजनांचा पाऊस या मतदारसंघात पडत असतो. त्यांच्या कार्यकर्तृत्वाची दखल घेत नुकतेच धर्मादाय खासगी रूग्णालयांच्या विधिमंडळ तपास समितीच्या अध्यक्षपदी त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. एकूणच, मसाधी राहणी, उच्च विचारसरणीफ या तत्वावर चालणार्‍या नमितातार्इंच्या नेतृत्वाखाली केज मतदारसंघाने विकासाच्या नव्या उंची गाठली आहे. जिल्ह्याच्या राजकारणात त्यांचे स्थान अजून भक्कम होत आहे. त्यांच्या माध्यमातून केज मतदारसंघाला एक अभ्यासू, निःस्वार्थी आणि विकासाभिमुख नेतृत्व लाभले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत ही त्यांच्या नेतृत्त्वाखाली पक्षाला मोठे यश मिळेल यात शंका नाही. अशा या केज मतदारसंघातील सर्वसामान्य जनतेच्या लाडक्या नेतृत्वास वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा..!

**राम कुलकर्णी**
(भाजप प्रदेश प्रवक्ता)

# लोकप्रतिनिधी म्हणतात,हे चाल्लय तरी काय!

सध्या सर्वोच्च न्यायालयात दोषी राजकारण्यांवर आजीवन निवडणूक लढण्यावर बंदी असावी याकरीता जनहित याचिकेवर सुनवायी सुरू आहे.देशाच्या १८ व्या लोकसभेत निवडून आलेले ५४३ खासदारांपैकी २५१ खासदार गुन्हेगार प्रकरणात दोषी आहेत.यात ३९ टक्के मंत्री गुन्हेगार प्रकरणात दोषी आहेत,तर २८ खासदारांना वेगवेगळ्या कोर्टाने गुन्हेगार घोषित केले आहे.यातील १९ खासदारांवर हत्या आणि महिला अत्याचारांसारखे अत्यंत गंभीर आरोप आहेत,तरीही मोठ्या डौलाने सांगतात की आम्ही समाजसेवक,लोकप्रतिनिधी व जनप्रतिनिधी आहोत.ही आश्चर्य व्यक्त करणारी व धक्कादायक बाब आहे. देशाची १४० कोटी जनसंख्या आहे त्यातील जर ४६ टक्के खासदार गुन्हेगार प्रकरणामध्ये दोषी असेल तर सर्वसामान्यांनी काय करावे! सध्याच्या परिस्थितीत २५१ खासदार दोषी आहेत म्हणजेच हे देशाच्या ६४ कोटी जनतेचे प्रतिनिधीत्व करीत आहेत.ही बाब स्वतंत्र भारतासाठी काळीमा फासणारी नाही का? गुन्हेगारीतुन आलेले खासदार जर देशाचे प्रतिनिधित्व करीत असेल तर हे देशाचे दुर्भाग्यच म्हणावे लागेल.यामुळे देशाच्या लोकांना चिंता आहे की,देशाचे ४६ टक्के गुन्हेगारीने दोषी असलेले खासदार सर्वसामान्यांना खरोखरच न्याय देऊ शकेल काय?हा मोठा प्रश्न आज १४० कोटी जनते समोर उपस्थित होतो.त्यामुळे प्रश्न उपस्थित होतो की, अशा खासदारांच्या क्षेत्रात गुन्हेगारीला जास्त वाव दिला तर जात नाही ना!असाही प्रश्न उपस्थित होतो. ज्या ठिकाणी गुन्हेगारीला चालना मिळते अशा क्षेत्रात गुन्हेगार खासदार निवडून आले असावेत असाही प्रश्न निर्माण होतो.परंतु अशा लोकसभा क्षेत्रातील सर्वसामान्यांचे कीती हालबेहाल व



अन्याय होत असतील हे सांगणे मात्र अत्यंत कठीण आहे.२०१९ मध्ये गुन्हेगारीने बरबटलेले खासदार ४३ टक्के होते आता ती संख्या वाढुन २०२४ मध्ये ४६ टक्यावर येवून पोहोचली आहे. तरीही स्वतःला स्वच्छ, निस्वार्थी आणि चांगल्या प्रतिमेचे समजतात ही अत्यंत गंभीर बाब आहे.दोषी राजकारणी दोषमुक्त झाले असले तरी त्यांच्या रक्तात दोष अवश्य दिसून येईल.त्यामुळे दोषी राजकारण्यांना राजकारणातुन जळामुळासकट बाहेर करने अत्यंत गरजेचे आहे.गुन्हेगारीमध्ये दोषी राजकारण्यांचा आपण जर देशातील राज्यांच्या दृष्टीकोनातून विचार केला तर १० राज्यातील तब्बल ५० टक्के खासदार गुन्हेगार क्षेत्रातुन आले आहेत अशाने गुन्हेगारीवर कसाकाय आळा बसेल हाही गहन आणि गंभीर विषय निर्माण होतो. देशाला गुन्हेगारीतुन मुक्त करायचे असेल तर सर्वप्रथम गुन्हेगार प्रकरणात दोषी राजकारण्यांवर अंकुश लावने अत्यंत गरजेचे आहे.कारण देशात गुन्हेगार प्रकरणात दोषी राजकारण्यांचा प्रवेश वाढला तर देशात हजारोंच्या संख्येने वाल्मिक कराड सारखे गुन्हेगार निर्माण होतील व प्रशासनाला गुन्हेगारीवर आळा घालण्यास मोठ्या कठीण परिस्थितीचा सामना करावा लागेल. या संपूर्ण बाबी लक्षात घेता सरकारने कठोर पाऊल उचलने गरजेचे आहे.कारण गुन्हेगारांची परिभाषा गुन्हेगारीमध्येच गणल्या गेली पाहिजे व त्यांची जागा त्यांना दाखविली पाहिजे असे मला वाटते.स्वच्छ व निर्मळ प्रशासन अंमलात आणण्यासाठी सर्वप्रथम गुन्हेगार प्रकरणात दोषी राजकारण्यांवर कठोर कारवाई करून त्यांना लोकप्रतिनिधी पदावरून हटविणे गरजेचे आहे. कारण अशा प्रवृत्तींच्या लोकांनी जबाबदार पदावर पदावर रहाने म्हणजे देशाचा अपमान समजल्या जाईल.

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(माजी विद्यापीठ प्रतिनिधी, नागपूर)**

# मराठी शिकणाऱ्यांना प्रोत्साहन द्या, त्यांच्या चुका काढू नका - प्राचार्य डॉ. भारत कर्‍हाड

दापोली, २८ फेब्रुवारीः ङ्गइतर भाषिक जेव्हा मराठीत बोलण्याचा प्रयत्न करतात, तेव्हा त्यांच्या चुका दाखवण्यापेक्षा त्यांना प्रोत्साहन द्यायला हवे,ङ्घ असे प्रतिपादन वराडकर बेलोसे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भारत कर्‍हाड यांनी मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने आयोजित चर्चासत्रात केले.महामहोपाध्याय भारतरत्न पां. वा. काणे स्मारक समितीच्या वतीने झालेल्या या कार्यक्रमात डॉ. कर्‍हाड म्हणाले, ङ्गबोलली जाणारी भाषा काही वेळा व्याकरण आणि उच्चार दृष्ट्या चुकीची असू शकते, पण त्यावर टीका करण्यापेक्षा त्या प्रयत्नांचा सन्मान करणे गरजेचे आहे.ङ्घ यासंदर्भात त्यांनी संत नामदेव महाराजांच्या अभंगातील ओळी उद्धृत केल्या बोलिले लेकुरें वेडी वाकुडी उत्तरें करा क्षमा अपराधें महाराज तुम्ही सिद्धें या अभंगाचा संदर्भ देत त्यांनी सांगितले की, ङ्गनवशिक्यांच्या चुका स्वीकारून, त्यांना मार्गदर्शन करण्याची जबाबदारी आपली आहे. भाषा ही संवादाचे साधन आहे, केवळ शुद्धता किंवा प्रमाणभाषा हा निकष नसून तिच्या प्रसारावर भर असायला हवा.डॉ. कर्‍हाड यांनी कश्मीरमधील शमीमा या



मुस्लिम महिलेचे कौतुक केले, जिने नुकत्याच पार पडलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात ङ्गपसायदानङ्घ सादर केले. उच्चाराच्या काही त्रुटींमुळे काही लोकांनी तिच्यावर टीका केली, मात्र डॉ. कर्‍हाड यांनी याविषयी स्पष्ट मत मांडले.ती मुलगी मराठी शिकण्याचा आणि सादरीकरणाचा प्रयत्न करत होती. तिच्या प्रयत्नांचे कौतुक झाले पाहिजे, टीका नव्हे. विशेषतः मचफ चा उच्चार मचहाफ ऐवजी मचम चाफ असा केला म्हणून तिच्या प्रयत्नांची टर उडवणे चुकीचे आहे. मराठीचा अभिजात दर्जा टिकवण्यासाठी सहकार्याची गरजङ्गमराठीचा अभिजात दर्जा टिकवायचा असेल, तर भाषा ही संवादासाठी असल्याचे ध्यानात ठेवावे. शुद्धतेपेक्षा तिचा प्रसार आणि स्वीकार महत्त्वाचा आहे. माध्यमांनीही या दिशेने सकारात्मक भूमिका घ्यावी,ङ्घ असे मत त्यांनी व्यक्त केले.

ज्येष्ठ साहित्यिक रेणूताई दांडेकर यांनी ङ्गअभिजात मराठीचा दर्जा टिकवणे ही महाराष्ट्रातील नागरिक आणि वाचनालयांची जबाबदारीङ्घ आहे असे मत व्यक्त केले महामहोपाध्याय भारतरत्न पां.वा. काणे स्मारक समितीच्या वतीने मराठी भाषा गौरव दिनानिमित्त २७ फेब्रुवारी रोजी महामहोपाध्याय भारतरत्न पां.वा. काणे स्मारक, जालगाव येथे ङ्गअभिजात मराठी भाषा म्हणजे काय?ङ्घ या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या चर्चासत्रात प्रमुख मार्गदर्शक वक्त्या म्हणून ज्येष्ठ साहित्यिका रेणूताई दांडेकर उपस्थित होत्या. मराठी भाषेच्या अभिजात दर्जाचा उलगडा करताना त्यांनी संतपरंपरेच्या दोन-अडीच हजार वर्षांच्या मौलिक योगदानावर प्रकाश टाकला. ओव्या, अभंग आणि वचने यांमधून मराठी संस्कृतीची समृद्धी स्पष्ट करत नव्या पिढीनेही ही परंपरा आत्मसात करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

पुढे त्या म्हणाल्या ङ्गमहाराष्ट्राच्या कोकण किनारपट्टीपासून ते अटकेपार काश्मीरपर्यंत मराठी भाषेचा विस्तार झाला आहे, याचा प्रत्येक मराठी भाषिकाने अभिमान बाळगावा.तसेच, मराठीचा अभिजात दर्जा टिकवण्याची जबाबदारी संपूर्ण महाराष्ट्रातील नागरिकांची आणि विशेषतः वाचनालयांची असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. माध्यमांनीही मराठीच्या संवर्धनासाठी विशेष लक्ष देणे आवश्यक असल्याचे मत त्यांनी मांडले चर्चासत्रात मराठी भाषाप्रेमींसह अनेक मान्यवरांनी सहभाग नोंदवला. यामध्ये कविता मराठे, नेत्रा करमरकर, सुहासिनी गोंधळेकर, समितीचे कार्याध्यक्ष विमल कुमार जैन, प्राचार्य डॉ. भारत कर्‍हाड, कवी सुदेश मालवणकर यांचा समावेश होता. कार्यक्रमाला अ‍ॅड. नूतन परांजपे, समिती सचिव रमेश जोशी, निलीमा परांजपे, ग्रंथपाल आंबेरकर, पत्रकार शशी राऊत, कवी अजित कांबळे, अस्मिता परांजपे, स्मिता जोशी, पत्रकार सलीम रखांगे यांसारखे अनेक मराठीप्रेमी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी समिती अध्यक्ष प्रशांत परांजपे यांनी ङ्गमराठी भाषेचा अभिजात दर्जा टिकवण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्रातील मराठी भाषिकांनी ममायबोलीच्या पालखीचे भोईफ होणे आवश्यक आहे असे मत व्यक्त केले

# स्व.संतोष देशमुखांच्या मारेकर्‍यांना फाशीची शिक्षा द्या ; लिंबागणेशकरानी उत्स्फूर्त बंद पाळला :- डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेशः- ( दि.०४ ) मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांना अमानुषपणे मारहाण करताचे व्हिडिओ आरोपीने काढल्यानंतर ते व्हिडिओ सीआयडीने रिकव्हर करीत त्यातील स्क्रीन शाट चार्जशीटला जोडले आहेत.आता हे स्क्रीन माध्यामांच्या हाती लागले असुन ते फोटो माध्यमांनी प्रकाशित केल्यानंतर सर्वसामान्य माणसांचे मन हेलावून गेले असुन संपूर्ण महाराष्ट्र सुन्न झाला आहे.संतोष देशमुखांचा अमानुष छळ करून मृतदेहाची विटंबना केल्याने जनसामान्यांत संतापाची लाट उसळली आहे. बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील सर्व समाजातील ग्रामस्थांनी आज दि.४ मंगळवार रोजी सर्व दुकाने स्वयंस्फूर्तीने बंद ठेवत गावच्या वेशीवर ङ्ग स्व.संतोष आण्णा देशमुख अमर रहेङ्घ मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा झालीच पाहिजे अशा घोषणा देत उत्स्फूर्त बंद पाळला. यावेळी राजेभाऊ गिरे,पांडुरंग वाणी, बाळकृष्ण थोरात, साहेबराव निर्मळ, अशोक वाणी,विनायक मोरे,दशरथ दाभाडे, विठ्ठल कदम, दिनेश जाधव, महेश ढवळे, बाजीराव नाईगडे, रामकिसन



गिरे, अमोल साळवे, अर्जुन घोलप,रवी वायभट, हरिओम क्षीरसागर, डॉ.गणेश ढवळे आदि उपस्थित होते.नैतिकता म्हणून अजितदादा पवार यांनी बीड पालकमंत्री पदाचा राजीनामा द्यावा ; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बीडचे पालकमंत्री व्हावे :- डॉ.गणेश ढवळे

स्व.संतोष देशमुख यांना न्याय मिळण्यासाठी मंत्री धनंजय मुंडे यांचा पोलिस प्रशासनावर दबाव असल्याने निष्पक्ष तपास होणार नसल्याने त्यांचा राजीनामा घ्यावा.अशी बीडकरांची मागणी होती.मात्र पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांनी याकडे दुर्लक्ष केल्यामुळे एकंदरीतच बीडचे पालकमंत्री बीडमधील स्व.संतोष देशमुख यांच्या अमानुष हत्येप्रकरणी संवेदनशील असल्याचे दिसून आले नाही. मुख्यमंत्री यांनी मागील केल्यानंतर धनंजय मुंडे यांनी राजीनामा दिला. त्यामुळे आता नैतिकता म्हणून अजितदादा पवार यांनी बीड पालकमंत्री पदाचा राजीनामा देऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बीडचे पालकमंत्री पद स्विकारावे अशी मागणी डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे.

# डिजिटल मीडिया परिषदेच्या बीड तालुकाध्यक्षपदी अभिजीत पवार यांची निवड..

## कार्याध्यक्ष लक्ष्मण गायकवाड, तर उपाध्यक्षपदी दीपक वाघमारे यांची वर्णी

बीड ( प्रतिनिधी ) मराठी पत्रकार परिषदेची संलग्न असलेल्या डिजिटल मीडिया परिषदेचे जिल्हाध्यक्ष दिनकर शिंदे यांनी बीड तालुकाध्यक्षपदी अभिजीत पवार, कार्याध्यक्ष लक्ष्मण गायकवाड, उपाध्यक्षपदी दीपक वाघमारे तर सचिवपदी शेख समद यांची निवड जाहीर केली आहे. प्रिंट मीडिया सोबतच डिजिटल मीडियाला अनन्य साधारण महत्त्व प्राप्त झाल्याने, या पुढील काळात प्रत्येक घटना आणि माहिती तात्काळ



वाचक आणि प्रेक्षकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी आणि त्यासोबतच डिजिटल मीडियामध्ये काम करणा-या प्रत्येक पत्रकारांच्या हितासाठी, मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख यांनी डिजिटल मीडिया परिषद स्थापन केली आहे. त्यांच्याच नेतृत्वाखाली आणि डिजिटल मीडिया परिषदेचे राज्याध्यक्ष अनिल वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली डिजिटल मीडिया परिषदेचे जिल्हाध्यक्ष दिनकर शिंदे यांनी दिनांक ३ मार्च २०२५ रोजी डिजिटल मीडियाची बीड तालुका कार्यकारणी पुढील दोन वर्षासाठी जाहीर केली आहे. यात तालुकाध्यक्षपदी- अभिजीत पवार, कार्याध्यक्ष- लक्ष्मण गायकवाड, उपाध्यक्ष- दीपक वाघमारे, सचिव- शेख समसाद तर संघटकपदी- अरबाज आतार खाजामिया यांचा समावेश आहे.बीड तालुक्यात यूट्यूब चैनल, इंस्टाग्राम, फेसबुक, ब्लॉग, व्हाट्सअप, ऑनलाइन दैनिक यासह वेगवेगळ्या डिजिटल मीडियाच्या माध्यमातून शेकडो पत्रकार काम करत आहेत. त्यांना संघटित करून योग्य दिशेने आणि सुसूत्र पद्धतीने डिजिटल मीडियाचे काम व्हावे. त्यासोबतच या क्षेत्रात काम करणा-या प्रत्येक पत्रकाराला सुरक्षा देऊन त्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी डिजिटल मीडिया परिषद काम करत आहे. यासाठी बीड तालुका कार्यकारणी जाहीर करण्यात आली असून पदाधिका-यांनी जास्तीत जास्त सदस्य नोंदणी करावी असे आवाहन डिजिटल मीडिया परिषदेचे जिल्हाध्यक्ष दिनकर शिंदे यांनी करून नूतन पदाधिका-यांचे अभिनंदन केले आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
बुधवार ५ मार्च २०२५
https://lokaarambh.com



# विद्यार्थी मित्रांनो भाषेवर प्रभुत्व ठेवायला शिकावे : बाबासाहेब गोंटे

अंबड मत्स्योदरी चे शिक्षक बाबासाहेब गोंटे यांनी शहरातील मत्स्योदरी कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात सोमवार दिनांक ३ मार्च २०२५ रोजी मराठी भाषा गौरव दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी प्रमुख व्याख्याते म्हणुन बाबासाहेब गोंटे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मिलिंद पंडित तर व्यासपिठावर उपप्राचार्य प्रा. ज्ञानेश्र्वर उबाळे, संत साहित्याचे गाढे अभ्यासक तथा मराठी विभाग प्रमुख डॉ. राम रौनेकर, पर्यवेक्षक प्रा.पांडूरंग काळे,प्रा. सुभाष जीगे, श्रीधर कापसे यांची प्रमूख उपस्थिती होती. यावेळी बाबासाहेब गोंटे म्हणाले मराठी मातृ भाषेचा प्रत्येकांनी गौरव करायला हवा. मराठी भाषेची महती अनेक साधू संतांनी आपल्या अभंग, गौळण,भारुड यातुन तर अनेक शाहिरांनी मराठी भाषेचे मोठेपण विशद करताना पोवाडे गायले आहे. मराठी भाषेचा झेंडा साता समुद्रापार गेला आहे. प्रत्येकानी आपल्या मातृ भाषेतून आपले अस्तित्व निर्माण करताना भाषेचा गौरव करायला शिकावे. याप्रसंगी अध्यक्षीय समारोप करताना डॉ. मिलिंद पंडित यांनी भाषेला समृध्द करण्यासाठीं ज्ञानाच्या कक्षा रुंदावण्यासाठी वाचन क्षमता वाढवायला हवी. असे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख डॉ.राम रौनेकर यांनी तर बहारदार सूत्रसंचलन कवी प्रा. दीपक राखुंडे व शेवटी आभार प्रदर्शन प्रा. डॉ.लक्ष्मण गादगे यांनी मानले. याप्रसंगी कार्यक्रमाला मराठी विगागाच्या डॉ. सुषमा प्रधान, प्रा.संपत पवार,राष्ट्रीय सेवा योजना

# संतोष देशमुख हत्याकांड प्रकरणातील आरोपींना फाशी व्हावी या मागणीसाठी घाटकोपर शिवसेना पश्चिम विधानसभा क्षेत्राच्या वतीने आंदोलन

घाटकोपर, बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील हादरवणारे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले आणि सर्वच स्तरांतून या फोटो नंतर हळहळ व्यक्त करण्यात आली.अतिशय अमानुष पद्धतीनं देशमुख यांना माराहाण करत असूरी वृत्तीनं आरोपींनी हा गुन्हा केला आणि त्याची छायाचित्र,व्हिडीओ सुद्धा काढले.या कृत्याचा निषेध समाजाच्या सर्व स्तरांतून केला जात असून,आता ही मन हेलावणारी दृश्य व्हायरल झाल्यानंतर सर्वच स्तरातून आरोपींना कठोरातील कठोर शिक्षा व्हावी अशी मागणी होत आहे.तसेच शिवसेना घाटकोपर पश्चिम विधानसभा क्षेत्राच्या वतीने घाटकोपर अमृत नगर येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक याठिकाणी संतोष देशमुख हत्याप्रकरणातील क्रूरकर्मा आरोपी वाल्मीक कराड याला फाशी व्हावी.तसेच या हत्याकांडात जे जे आरोपी आहेत व जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर कायद्याद्वारे कठोरातील कठोर कारवाई व्हावी अशी मागणी करत निषेध म्हणून वाल्मीक कराड याच्या प्रतिकात्मक पुतळ्याचे दहन करत आंदोलन करण्यात आले.यावेळी विधानसभा प्रमुख डॉ.सुबोध बावदाने,माजी नगरसेविका डॉ.भारती बावदाने,माजी नगरसेवक दिपक बाबा हांडे व घाटकोपर पश्चिम विधासभा क्षेत्रातील शिवसेनेचे असंख्य कार्यकर्ते व पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.



# बीड बसस्थानकाच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

पुणे येथील स्वारगेट बसस्थानकावर महिलेवर झालेल्या अमानुष प्रकारानंतर संपूर्ण राज्यात खळबळ उडाली आहे. ही घटना डोळ्यांसमोर ठेवून बीड जिल्ह्यातील निर्भीड पत्रकार संघाच्या महिला पदाधिकाऱ्यांनी बीड बसस्थानकाच्या सुरक्षेबाबत चिंता व्यक्त करत तात्काळ उपाययोजना करण्याची मागणी पोलीस अधीक्षकांकडे निर्भिड पत्रकार संघटनेच्या महिला जिल्हाध्यक्षा किरण डोळस यांनी केली आहे. बीड बसस्थानकाचे काम मागील एक वर्षापासून सुरू आहे. या ठिकाणी पूर्वी असलेली पोलीस चौकी आता दिसेनाशी झाली आहे. सध्या केवळ दोन पोलीस कर्मचारीच सुरक्षेसाठी आहेत, तर रात्रीच्या वेळी खाजगी सुरक्षा रक्षकही उपलब्ध नसतात.काम सुरू असल्याने बसस्थानकावर सर्वत्र अंधार आहे. शिवाय, मुख्य प्रवेशद्वारालाही गेट नाही. त्यामुळे रात्रीच्या वेळी नशेखोर व गुंड प्रवृत्तीचे लोक बसस्थानकात मुक्त वावरताना दिसतात. परिणामी महिला प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.पुणे येथील दुर्दैवी घटना बीडमध्ये घडू नये यासाठी तातडीने कडक सुरक्षा उपाययोजना कराव्यात, अशी मागणी निर्भीड पत्रकार संघाच्या महिला जिल्हाध्यक्षा किरण डोळस व जिल्हा सचिव आम्रपाली साबळे, महिला जिल्हा उपाध्यक्ष मोनिका बेदरेयांनी निवेदनाद्वारे पोलीस अधीक्षकांकडे केली आहे तसेच पोलीस अधीक्षकांनी तत्काळ लक्ष घालावे आणि बीड बसस्थानकाला सुरक्षित बनवावे, अशी मागणी करण्यात आली

# तळा तालुका क्रिकेट असोसिएशन आयोजित टी.टी.सी.ए मानाचा चषक २०२५ संपन्न

मुंबई,(केतन भोज);रायगड जिल्ह्यातील तळा तालुका क्रिकेट असोसिएशन आयोजित टी.टी.सी.ए मानाचा चषक २०२५ मानसरोवर मैदान नवी मुंबई येथे शनिवार दि.०१ मार्च आणि रविवार दि.०२ मार्च रोजी असोसिएशनचे अध्यक्ष पांडुरंग पाटील आणि कार्याध्यक्ष राजेश पेलनेकर व इतर सर्व कार्यकारिणी यांच्या अथक परिश्रम आणि मेहनत घेऊन ही स्पर्धा संपन्न केली.एकूण ३२ संघाने या स्पर्धे मध्ये सहभाग घेतला



होता.यावेळी प्रथम क्रमांक के.सी.सी बोईज बेलघर रोख रुपये ४४फ४४/- तसेच चषक,द्वितीय क्रमांक साई कृपा क्रिकेट क्लब गिरने रोख रुपये २२,२२२/- तसेच चषक,तृतीय क्रमांक कालभैरव क्रिकेट संघ अडनाले रोख रुपये ११,१११/तसेच चषक आणि चतुर्थ क्रमांक ओमसाई क्रिकेट संघ तळा रोख रुपये ७,७७७/ तसेच चषक या संपूर्ण स्पर्धेमध्ये शिस्तबद्ध संघ म्हणून साई कृपा क्रिकेट क्लब गिरने या संघाला गौरवण्यात आले.मलिकावीर - अजय पाशीलकर गिरने,उत्कृष्ट गोलंदाज - साहिल चोरगे,ओमसाई तळा,उत्कृष्ट फलंदाज - यश के.सी.सी बेलघर,सामनावीर - प्रकाश स्पर्धे साठी उपस्थित प्रमुख पाहुणे- रोहिदास सनस, सुरेश वाडकर, सहदेव खूटिकर, रूपेश पेलनेकर, तानाजी कालप, जनार्दन पाटील बेलघर. या स्पर्धेचे सूत्रसंचालन सचिव भरत नाडकर यांनी केले आणि यू-ट्यूब लाईव्ह प्रेक्षपण रविंद्र कावजी यांनी केले. याशिवाय स्पर्धेचे पंच -मनोज भगत,एकनाथ घांगरूम,प्रवीण भौड,यशवंत भगत,दिनेश पेलणेकर,जयवंत बालबा,भालचंद्र धाकम,नितेश महाडिक, रमेश नाडकर,रामदास फकीर, तीसरे पंच - सखाराम राऊत आणि पांडूरंग तांदलेकर यांनी काम पाहिले तसेच समालोचक - पांडूरंग पाटील,राजेश पेलनेकर,सुरेश शिंदे,संतोष पवार,यांनी केले. स्कोरर म्हणून - नथुराम घाग,कु.लक्ष्मण बुवाजी,नामदेव बुवाजी,कुणाल मंचेकर यांनी केले तसेच मैदानावरील सर्व सुख-सुविधा जितेंद्र कदम,खजिनदार केतन खूटिकर,हेमंत सनस,योगेश सपकाल,विठोबा भात्रे,समीर पारावे सचिन नलावडे आणि गणेश निवाते यांनी पार पाडली.

# राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष चव्हाण याना मारहाण

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण यांना सोमवारी मारहाण झाल्याच्या अनेक पोस्ट सोशल मीडियावर व्हायरल झाल्या आहेत. तर व्हिडिओ आणि काही फोटोही फिरत आहेत. पण या बाबतीत अद्याप याबाबत तक्रार करण्यात आलेली नाही. ही मारहाण का झाली आणि कोणी केली? याबाबत काहीही स्पष्ट नाही. अंबाजोगाई येथे पत्रकार परिषद घेऊन त्यात त्यांनी धनंजय मुंडे यांची बदनामी केली तर शांत बसणार नाही असा इशारा दिला होता. यामुळे ही मारहाण झाली असावी अशी चर्चा सुरू आहे. बीड जिल्ह्यात मागील तीन महिन्यांपासून संतोष देशमुख हत्या प्रकरण राज्यभर गाजत आहे. याप्रकरणी धनंजय मुंडे यांच्या उजवा हात समजला जाणार कराड जेलमध्ये आहे. यामुळे धनंजय मु ंडे यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात येत आहे. याच दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाचे जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण यांनी काही दिवसांपूर्वी पत्रकार परिषद घेऊन धनंजय मुंडे यांची नाहाक बदनामी केली तर शांत बसणार नाही बदनामी करणाऱ्यांना जशास तसे उत्तर दिले जाईल असा दम दिला होता. यानंतर राजेश्वर चव्हाण यांच्या विरुद्ध संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केली जात होती. दरम्यान सोमवारी ते नेहमी प्रमाणे हातोला गावातून बाहेर निघताच काही तरुणांनी त्यांचे वाहन थांबविले

# पोलिसांना एक महिन्याचा अल्टीमेटम महादेव मुंडेंच्या पत्नीचं आमरण उपोषण मागे

बीड । प्रतिनिधी परळी येथील महादेव मु ंडे हत्या प्रकरणातील आरोपींना अटक करावी, या मागणीसाठी महादेव मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे आजपासून आमरण उपोषणाला बसल्या होत्या. बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर त्यांनी उपोषण सुरु केले होते. महादेव मु ंडे प्रकरणाचा तपास तात्काळ एसआयटी आणि सीआयडीकडे दाखल करावा. खुनाच्या कटात ज्यांनी फोन केले त्या आरोपींचे सीडीआर काढावेत. महादेव मु ंडे यांच्या आरोपींना तात्काळ अटक करावी, या ३ प्रमुख मागण्यांसाठी आमरण उपोषण केले जात होते. अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके यांच्याकडून आश्वासन देण्यात आल्यानंतर त्यांनी आपले आमरण उपोषण तूर्तास स्थगित केले आहे. परळी येथील



व्यापारी महादेव मु ंडे यांची गेल्या वर्षी ऑक्टोबर महिन्यात हत्या झाली होती. या हत्या प्रकरणाला १६ महिने उलटून गेले, तरीही आरोपी मोकाटच आहेत. पोलिसांनी एकाही आरोपीला अटक केली नाही. वाल्मिक कराड आणि त्यांच्या साथीदारांनी महादेव मु ंडेंची हत्या केल्याचा आरोप केला जात आहे. पोलिसांनी आरोपींना अटक करून कठोरातील कठोर शिक्षा करावी, अशी मागणी मु ंडे कुटुंबीयांची आहे. अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके यांनी उपोषण स्थळी भेट देत मु ंडे कुटु ंबियांची समजूत काढली. महादेव मु ंडे हत्या प्रकरणातील आरोपीला लवकरात लवकर अटक करू, आमच्यावर विश्वास ठेवा, असा शब्द अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके यांनी मु ंडे कुटुंबियांना दिला. यानंतर ज्ञानेश्वरी मु ंडे यांनी आमरण उपोषण तूर्तास स्थगित केले. अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके यांनी मु ंडे कुटुंबियांना पाणी पाजल्यानंतर त्यांनी उपोषण सोडले. ज्ञानेश्वरी मु ंडे म्हणाल्या की, एक महिन्यात आरोपीला अटक करू, असे आश्वासन दिले. त्यामुळे उपोषण स्थगित केले आहे.

# आहेत ही आठवण निश्चित येत राहील. वडवणीच्या बाजार तळाचा प्रश्न ऐरणीवर?

वडवणी शहराच्या बाजार तळाच्या जागेवर नगरपंचायत कार्यालयाची वास्तू उभा राहणार आहे. दोन दिवसांपुर्वीच भूमिपुजन केले असून प्रत्यक्ष कामाला देखील सुरुवात झाली आहे. यामुळे आठवडी बाजाराचा प्रश्न ऐरणीवर आला असून बाजार उद्या असला तरी आज मंगळवार रोजीच व्यापारी बांधव नविन जागा शोधत असून मारुती मंदिरांच्या पाठीमागील जागेवर बिस्तान मांडण्यासाठी तोबा गर्दी दिसून आली असून जागा धरण्यासठी प्रचंड झुंबड दिसून आली आहे. याबाबत आधिक माहिती अशी कि, बीड जिल्ह्यातच नव्हे तर मराठवाड्यात वडवणी शहराचा आठवडी बाजाराचा नामंकित बाजार म्हणून ओळखला जातो.जिल्ह्यासह शेजारी जिल्ह्यातील व्यापारी बांधव याठिकाणी व्यापार करण्यासाठी येतात. म्हणून या आठवडी बाजाराला महत्व प्राप्त होते. तर तालुक्याच्या दृष्टीने या दिवसाला देखील अतिशय महत्व प्राप्त होते. मागील अनेक वर्षापासून आठवडी आणि विशेष भाजी पाल्याचा आठवडी बाजार हा बाजार तळावर भरला जात होता. मगील दोन चार वर्षापुर्वी याठिकाणी टोलेजंग व्यापारी संकुलन उभारले आहे. तर आता उर्वरित ठिकाणी नगरपंचायतीची इमारत मंजूर झाली



किल्ले धारूर तालुका शिव सेनेच्या वतीने मस्साजोग चे सरपंच संतोष देशमुख यांचा मारेकरी वाल्मिक कराड यांच्या विरोधात बीड जिल्हा शिवसेनेचे जिल्हाप्रमुख आदरणीय अनिल दादा जगताप यांच्या आदेशावरून आंदोलन करुन फाशीची मागणी करण्यात आली यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख नारायण कुरुंद युवासेना शहर प्रमुख संदेश धुमाळ उपशहरप्रमुख गोविंद पांचाळ,प्रताप तिबोले शुभम निक्ते,विजय बारस्कर सह शिवसैनिक उपस्थित होते

# लिमगांवात मोठा आवाज, आकाशातून दगड पडले !

वडवणी : काल दुपाराच्या दरम्यान आकाशात प्रचंड मोठा आवाज होऊन दोन ते चार दगड पडले असल्याची घटना मौजे खळवट लिंमगांव येथे घडली आहे. माहिती मिळताच तहसिल प्रशासनाने तात्काळ घटनास्थळी भेट देत पाहणी आणि पंचनामा केला आहे. आकाशातून पडलेले दगड देखील ताब्यात घेतले आहेत. तर आज सकाळी छत्रपती संभाजी नगर येथील एमजीएम विद्यापीठाचे भू वैज्ञानिक शास्त्रज्ञ यांच्या टिमने घटनस्थळी जाऊन पाहणी करुन संशोधन आणि घटनेचा प्रकार लक्षात घेत गूढ काय ते लवकरच कळवू अशी माहिती दिली आहे. तर या घटनेन ग्रामस्थांमधून भिती व्यक्त केली जात आहे. याबाबत आधिक माहिती अशी कि, वडवणी तालुक्यातील खवळट लिमगाव येथे काल सोमवारी दुपारी दोन वाजण्याच्या दरम्यान आकाशामध्ये तीन मोठे आवाज होऊन आकाशामधून दगड कोसळले आहेत यातील एक दगड भिकाजी अंबुरे यांच्या घरावर पडला हा दगड इतक्या वेगाने पडला की घरावरील पत्रा तुटून हा दगड खाली पडला तसेच अन्य दोन दगड इतर शेतामध्ये



पडले अशी माहिती गावकऱ्यांच्या वतीने देण्यात आली आहे घरावर पडलेला दगड हा वेगळा असल्याचे गावकऱ्यांनी सांगितले तसेच दगड ज्यावेळी घरामध्ये पडला त्यावेळी हा दगड खूप गार असल्याचेही सांगण्यात आले तसेच खवळट लिमगाव च्या आजूबाजूच्या गावच्या नागरिकांनी देखील भला मोठा आवाज झाल्याचे सांगितले आहे हा आवाज नेमका कशाचा झाला आणि दगड नेमके कुठून पडले, तसेच पुन्हा संध्याकाळी ही घरावर दगड पडतील का या भीतीने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे घटनास्थळी वडवणी तहसील प्रशासनाने भेट देऊन हा नेमका दगड कुठून आणि कसा पडला याची माहिती गाव खऱ्या कडून घेतली तसेच पंचनामा केला आहे. तर आज सकाळी ए पी जे अब्दुल कलाम खगोल अंतराळ विज्ञान केंद्र छत्रपती संभाजीनगरचे अभ्यासक श्रीनिवस औंधकर , अभिनव विटेकर यांच्या टिमने भेट देत पाहाणी केली आहे. हा आवाज कशामुळे झाला, दगड पडण्याचे कारण काय ? यांचे गूढ काय ते लवकरच कळवू अशी माहिती दिली आहे.

# माझ्या शेतकऱ्यांना जपा; तक्रारी निकाली काढा-खा.बजरंग सोनवणे

केज । प्रतिनिधी मागेल त्याला सौर योजना देण्यात येते. याचा कालावधी ६ महन्यिा ऐवजी ३ महन्यिासाठी करावा, यासाठी आपण आपल्या वरष्ठि कार्यालयास पत्रव्यवहार करावा, महावितरण विभाग हा थेट शेतकऱ्यांशी संबधित येतो. याठिकाणी शेतकऱ्यांच्या अनेक तक्रारी येत आहेत. त्या तक्रारी निकाली काढा, माझ्या शेतकऱ्यांना जपा, त्यांना त्रास झाला नाही पाहिजे, अशा सुचना खा.बजरंग सोनवणे यांनी केज येथील आढावा बैठकीत दल्यिा. दि.३ मार्च रोजी खा.बजरंग सोनवणे यांनी केज तालुक्याच्या सर्व विभागाची आढावा बैठक येथील पंचायत समिती केज कार्यालयात सकाळी १०.३० वाजता घेतली. ही बैठक सलग चार तास चालली. यावेळी उपविभागीय अधिकारी वजाळे, तहसीलदार गिडा, कार्यकारी अभियंता आंधळे, मोराळे, गटविकास अधिकारी यांच्यासह सर्व विभागाचे विभाग प्रमुख उस्थितीत होते. तहसील कार्यालया संबंधीत श्रावणबाळ व संजयगांधी योजनेची बैठक तत्काळ घेण्यासंदर्भात सूचना देण्यात आल्य. यानंतर कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांशी त्यांनी संवाद साधला. यावेळी पीकविमा, पि.एम.किसान आदींचा आढावा घेताना शेतकऱ्यांची अडवणूक होणार नाही याची काळजी घ्या, तसेच जल्ह्यिात मंडळ निहाय हवामान यंत्र मंजूर करण्यासाठी पर्यावरण मंत्र्यांकडे मागणी करू, केजमध्ये एक महन्यिापासून शहरातील लोकांना पाणी मिळत नाही. हा प्रकार चुकीचा असून अधिकाऱ्यांनी याकडे गांभर्यिाने पहावे, असे सांगताना अधिकाऱ्यांनाही चांगलेच फैलावर घेतले. पाणी पुरवठा योजना कामाची तत्काळ दुरुस्ती करून शहरातील लोकांना पाणी तत्काळ उपलब्ध करून द्या, अशा सुचनाही त्यांनी केल्या. बांधकाम विभागाने कामे दर्जे दार करून घ्यावेत, बोगस कामाची गय करू नका, अश्या सूचना केल्या. अहमदपूर ते चु ंबळी फाटा हा रस्ता अत्यंत



सुमार दर्जाचा झाला आहे. अशा रस्त्यामुळे अनेकांचे जीव गेलेले आहेत. त्याची सर्व जबाबदारी कॉन्ट्रॅक्टर व संबाधित अधिकाऱ्यांची आहे, त्यामध्ये तत्काळ दुरुस्ती करण्याच्या सूचनाही यावेळी केल्या. भूमी अभिलेख विभागाकडे शेतकऱ्यांनी दाखल केलेले प्रस्ताव तत्काळ निकाली काढा, त्यांची आडवणूक, पिकळवणूक खपवून घेतली जाणार नाही. असा सज्जड इशाराही खा.सोनवणे यांनी दिला.

# मस्साजोग ते बीड सदभावना पदयात्रा

## जातीय सलोख्यासाठी काँग्रेसचा पुढाकार

किल्ले धारूर। प्रतिनिधी बीड जिल्ह्यात जातीय सलोखा कायम राखण्यासाठी काँग्रेसने ८ आणि ९ मार्च रोजी मस्साजोग ते बीड अशी दोन दिवसीय सदभावना पदयात्रा आयोजित केली आहे. या पदयात्रेच्या नियोजनासाठी ३ मार्च रोजी किल्ले धारूर येथील राहुल हॉटेलमध्ये बैठक झाली. युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीला युवक काँग्रेस प्रदेश सरचिटणीस आदित्य पाटील, तालुकाध्यक्ष सिद्धेश्वर रणदिवे , ज्येष्ठ नेते अंजनडोह चे, सुबराव सोळंके आवेज कुरेशी, नितीन मिश्रा, उत्तमराव ढगे, शेख शाफिक, यांच्यासह विविध पक्षांचे कार्यकर्ते आणि सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. जिल्ह्यात सुरू असलेल्या जातीय तणावाच्या पार्श्वभूमीवर ही पदयात्रा काढण्यात येत असल्याचे राहुल सोनवणे यांनी सांगितले. ङ्कङ्कगेल्या ८० दिवसांपासून बीड जिल्हा चर्चेत आहे. समाजात जाती-जातींमध्ये फूट पडत आहे. हे थांबवण्यासाठी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष सपकाळ आणि खासदार रजनीताई पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ही पदयात्रा काढण्यात येत आहे,ङ्कङ्क असे ते म्हणाले. युवक काँग्रेस प्रदेश सरचिटणीस आदित्य पाटील यांनीही जातीय सलोख्याचे महत्त्व विशद केले. जिल्ह्यात जातीयवाद वाढला आहे. तो थांबवण्यासाठी सर्व जाती-धर्माच्या लोकांनी या पदयात्रेत सहभागी व्हावे,ङ्कङ्क असे आवाहन त्यांनी केले. बैठकीच्या सुरुवातीला कैलास संतोष देशमुख यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. प्राचार्य विजय शिनगारे यांनी सूत्रसंचालन केले, तर सोळंके यांनी आभार मानले.

## गव्हाचे विक्रमी उत्पन्न काढल्यामुळे शेतकऱ्याच्या मित्रांनी केला शेतकऱ्याचा सत्कार



महागांव प्रतिनिधी

एक बाजू पाहता शेतकरी आत्म हत्यांचे प्रमाण वाढले असता प्रभाकर साहेबराव कोपरकर राहणार महागांव यांनी शेतीमध्ये प्रचंड मेहनत घेऊन आणि त्यांच्या दीर्घकालीन शेती करण्याचा अनुभवाचा वापर करून अतिशय मुबलक खर्चात विक्रमी उत्पन्न काढून अशा या मेहनती शेतकऱ्याने इतर शेतकऱ्यांसमोर एक आदर्श निर्माण केला व याबद्दल त्यांच्या अतिशय जवळ असलेल्या दीपक गाडबैले व प्रवीण गावंडे या मित्र शेतकऱ्यांच्या सल्ल्यावरून त्यांचा जिजाऊ चौक महागांव या ठिकाणी सत्कार करण्यात आला व त्यांनी त्यांचे मनोगत व्यक्त करताना असे सांगितले की शेतकऱ्यांने खचून न जाता शेतीमध्ये शेतीची व जे पिक उत्पन्नासाठी लावणार आहोत त्याविषयी माहिति काढून व प्रचंड प्रमाणात मेहनत घेऊन शेती करावी जेणेकरून शेतकऱ्यांना आत्म हत्या करण्याची वेळ येऊ नये व त्यांनी असे सांगितले मी माझ्या शेतात गव्हाचे सात बॅग सरिता नावाचे वान घेऊन ११० क्विंटल गव्हाचे उत्पन्न काढले व प्रचंड मेहनत घेऊन उत्पन्न काढले व यावेळी त्यांनी सर्वांचे मनापासून आभार मानले व यावेळी सामाजिक कार्यकर्ते बाळू पाटील नरवाडे विवेक नरवाडे सुरज धोंगडे रुद्र दळवे व शेतकऱ्यांमध्ये तुकाराम गाडबैले बंडू पाटे दिगांबर गाडबैले संजय नरवाडे नरेंद्र गाडबैले इत्यादी नागरिक मोठ्या संख्येनेउपस्थित होते

# चार वर्षापुर्वीच्या मर्डर मधील दोन तर १९ मोटार सायकल चोरीमधील एक आरोपी

## स्थानिक गुन्हे शाखेने मोठया शिताफीने पकडले.

अंबाजोगाई प्रतिनिधीः-

बीड जिल्हयामध्ये गुन्हेगारी याचा आढावा घेतला असता बऱ्याच गुन्हयामधील आरोपी हे गुन्हा केल्यानंतर पळुन जातात व मिळुन येत नाहीत त्यामुळे बीड जिल्हयाम धील पोलीस अभिलेखावरील पाहीजे व फरारी आरोपीस पकडुन संबधीत पोलीस ठाणेच्या ताब्यात देण्या बाबत वरीष्ठांनी आदेश दिल्याने चार वर्षापुवीच्या खुनामधील दोन आरोपी व १९ मोटार सायकली मधील एक असे तीन आरोपींना पकडण्यास स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकास यश आले आहे या बाबत सवीस्तर वृत्त असे की दिनांक ३१.०८.२०२१ रोजी यातील फिर्यादी नामे दिलीप अभिमान धोत्रे रा.अंबाजोगाई यांनी पोलीस ठाणे अंबाजोगाई शहर येथे तक्रार दिली होती की, डुक्कर का मारले या कारणावरुन अंबाजोगाई येथील आरोपींनी फिर्यादीच्या भाऊ रवी अभिमान धोत्रे यास खंजीर व चाकुने भोसकुन एकुण ११ आरोपींनी त्याचा खुन केला होता यातील आरोपी हे गुन्हा केल्यापासुन फरार झाले होते. पोलीसांनी वेळोवेळी शोध घेवुन देखील मिळुन येत नव्हते. या गुन्हयातील आरोपी हे परळी येथील उड्डाणपुलाखाली दिसल्याचे गोपनिय बातमीदारामार्फत माहीती स्थानिक




गुन्हे शाखेचे पथकास मिळाल्याने सदरील पथकाने तात्काळ परळी येथे जावुन सापळा रचुन मोठया शिताफीने खुनामधील दोन आरोपी १.तेजसिंग उर्फ तेजेश शेरसिंग गोके, वय ३५ वर्ष, २.पुनमसिंग तारासिंग टाक, वय ४० वर्ष, दोन्ही रा शासकीय बांधकाम विभागाचे पाठीमागे असणाऱ्या झोपडपट्टी अंबाजोगाई याचा शोध घेवुन सकाळी ताब्यात घेतले आहे. तसेच त्याचे सोबतच अंबाजोगाई,बीड व लातुर जिल्हामधील एकुण १९ मोटार सायकल चोरीच्या गुन्हयामध्ये फरार असलेला आरोपी नामे रोशनसिंग यशपालसिंग उर्फ रिशपालसिंग टाक, वय २० वर्ष, रा.अंबाजोगाई हा देखील आरोपी मिळुन आला आहे.सदरील तीन ही आरोपी हे पुढील कारवाई कामी पोलीस ठाणे अंबाजोगाई शहर यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरील कारवाई हि श्री नवनीत काँवत, पोलीस अधीक्षक,बीड, श्री चेतना तिडके, अपर पोलीस अधीक्षक, अंबाजोगाई, श्री उस्मान शेख, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सुशांत, पोलीस हवालदार मारोती कांबळे, विकास राठोड, बाळकृष्ण जायभाये, सानप, राजु पठाण, मनोज जोगदंड, पोलीस अंमलदार बप्पासाहेब घोडके, चालक नितीन वडमारे व गणेश मराडे यांनी केली आहे.

# मेरुगिरी मॉर्निंग ग्रुपच्या वतीने काशिनाथराव देशमुख यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

परळी वैजनाथ प्रतिनिधी...

मेरूगिरी मॉर्निंग वॉकिंग ग्रुपचे सदस्य तथा परळी शहारातील सुप्रसिद्ध आडत व्यापारी श्री. काशिनाथराव देशमुख यांचा जन्मदिनाच्या निमित्ताने शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन पेढा भरवत सत्कार करून त्यांचे मेरूगिरी मॉर्निंग ग्रुपच्या सर्व सदस्यांच्या वतीने अभिष्टचिंतन करण्यात आले. यावेळी समाजातील विविध स्तरातून वाढदिवसानिमित्त देशमुख यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव झाला.

परळी शहरातील सुप्रसिद्ध तथा प्रतिष्ठित आडत व्यापारी व मेरु गिरी मॉर्निंग वॉकिंग ग्रुपचे सदस्य श्रीमान काशिनाथराव देशमुख यांचा वाढदिवस त्यांच्या कार्यालयात एका छोटे खाणी कौटुंबिक कार्यक्रमात साजरा करण्यात आला. यावेळी काशिनाथराव देशमुख यांचे वाढदिवसाच्या निमि



त्ताने शाल, श्रीफळ तथा पुष्पगुच्छ देऊन पेढा भरवून केक कापत मेरूगिरी मॉर्निंग ग्रुपच्या सर्व म

ान्यवर सदस्यांच्या वतीने अभिष्टचिंतन करत सत्कार करण्यात आला. या सत्कार सोहळ्याप्रसंगी मेरुगिरी मॉर्निंग ग्रुपचे सर्वश्री प्रभाकरराव देशमुख, नितीन मामा कुलकर्णी, प्रकाश आप्पा इटके, महावीर नाना महालिंगे, रमेश कोम्मावार सर, प्रल्हादराव काळे, विनायक दहिवाळ, काशिनाथ शंकुरवार, वैजनाथ माने, वैभव आंबेकर, आनंत देशमुख, श्रीराम लांडगे, यांच्यासह मेरुगिरी मॉर्निंग ग्रुपच्या सर्व सदस्यांची उपस्थिती होती.

यावेळी व्यक्त होताना जमलेल्या सर्व मान्यवरांनी त्यांच्या आगामी आरोग्यदायी आयुष्यासाठी त्यांना शुभेच्छा दिल्या. वाढदिवसाच्या निमित्ताने समाजातील व्यापारी वर्ग, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार, विविध क्षेत्रातील नामवंत तसेच परळी शहरातील सर्व स्तरातील प्रतिष्ठित नागरिकांच्या वतीने देशमुख यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव झाला.

## संविधान प्रतिकृती अवमान व मृत्यू प्रकरणाची चौकशी निवृत्त न्यायमूर्ती विजय आचलिया यांनी केली पाहणी



परभणी प्रतिनिधी आशिष मुंढे

परभणी शहरातील जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोरील संविधान प्रतिकृतीच्या अवमानाची घटना आणि सोमनाथ सूर्यवंशी यांच्या दुर्दैवी मृत्यू प्रकरणाची चौकशी करण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती विजय एल. आचलिया यांची नियुक्ती करण्यात आली आहे.आज त्यांनी परभणी शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला भेट देऊन परिसराची पाहणी केली तसेच शहरातील काही दुकानांची पाहणीही केली. त्यानंतर नवा मोंढा पोलीस स्थानकाला भेट देऊन संपूर्ण घटनेची माहिति घेतली.

यावेळी जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे, जिल्हा पोलीस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी, अपर पोलीस अधीक्षक यशवंत काळे, नवा मोंढा पोलीस स्थानकाचे पोलीस निरीक्षक पांडुरंग गवते आदी अधिकारी उपस्थित होते.

तत्पूर्वी, सकाळी निवृत्त न्यायमूर्ती श्री. आचलिया यांनी जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक आणि मनपा आयुक्त यांच्या समवेत बैठक घेऊन घटनेचा सविस्तर आढावा घेतला

## महिलेचे १२ ग्रॅमचे गंठण केले लंपास

बीड । शहरातील जालना रोड परिसरातील महावीर पेट्रोल पंपासमोरून अज्ञात चोरटयांनी महिलेच्या गळ्यातील सोन्याचे १२ ग्रॅमचे गंठण लंपास केल्याची घटना (दि. १) शनिवार रोजी घडली असून शिवाजीनगर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे. सविस्तर माहिती अशी कि, शहरातील अयोध्या बाबासाहेब नेमाणे (वय ५२) रा. गायनगर बीड ह्या जालना रोड परिसरातील महावीर पेट्रोल पंपासमोरून (दि. १) शनिवार रोजी ६.३० च्या सुमारास जात असताना अज्ञात दोन चोरटयांनी दुचाकीवरून येत या महिलेच्या गळ्यातील सोन्याचे १२ ग्रॅमचे गंठण लंपास केले. (दि.२) रविवार रोजी अयोध्या नेमाणे यांच्या तक्रारीवरून शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस करत आहेत.

## महावितरणची वसुली जोरात आणि गाव मात्र अंधारात सेवा द्या,बील घ्या - सिरसाळा ग्रामस्थ

परळी : महावितरण विभाग सिरसाळ्यात थकीत/ चालू विद्युत बील वसुली जोरात करत आहे परंतु विद्युत पुरवठा सेवा सुरळीत दिल्या जात नाही .या मुळे संतापलेल्या ग्रामस्थांनी सुरळीत सेवे शिवाय बिल नाही असा निर्धार करत या बाबतचे निवेदन संबंधित प्रशासनास दिले आहे. दिलेल्या निवेदनात म्हटले आहे कि,महावितरण कंपनीकडून सिरसाळा येथे दिनांक ५ मार्च पासून विज बिलाची वसुली करण्याकरिता मोहीम राबविण्यात येणार असल्याची माहिती समजण्यात आली आहे. परंतु गेल्या दोन महिन्यापूर्वी सिरसाळा येथे भरपूर वसुली केली आहे. जशी वसुली केली आहे तशी सुविधा सुद्धा उपलब्ध करून देणार असल्याची



ग्वाही त्या वेळी दिली होती परंतु महावितरण कार्यालयाकडून कसल्याही प्रकारे सुविधा उपलब्ध झालेली नाही, उलट लाईटचा सतत लपंडाव, नादुरुस्त रोहित्र, पोल,कुचकामी झालेल्या तारा झिरो व्होल्टेज अशाप्रकारे आपल्याकडून वीजपुरवठा केला जात आहे त्यामुळे अगोदर गावातील सर्वत्र रोहित्र/ डीपी, हाय होल्टेज नवीन तारा, सुरळीत व अखंडीत विद्युत पुरवठा इत्यादी सुविधा जोपर्यंत पूर्णपणे सुरळीतपणे देत नाहीत तोपर्यंत गावात वसुली करु नये, सध्या पवित्र अशा रमजान महिन्याची सुरुवात झाली आहे आणि सध्या उन्हाळ्याचे दिवस असल्याने लाईटचा सतत होणारा लपंडाव आणि झिरो होल्टेज यामुळे सिरसाळकरांची डोकेदुखी वाढलेली आहे ह्या प्रकरणाकडे आपण गांभीर्याने लक्ष देऊन सुरळीतपणे वीज पुरवठा अखंडित करावा व दिनांक ५ मार्च पासून करण्यात येणारी वसुली थांबण्यात यावी अशी मागणी निवेदनातून केली आहे. निवेदन देतांना फिरोज पठाण ,शेख नदीम, दौलत शेख,मोहम्मद शरीफ ,मैनुद्दीन पिंजारी, अशफाक पठाण, जावेद पठाण, तौफिक कुरेशी, रहिम बागवान आदी सह अनेक जण उपस्थित होते .

# परभणी जिल्हा आर्य वैश्य महासभेच्या पदाधिकाऱ्यांची बिनविरोध निवड

परभणी प्रतिनिधी आशिष मुंढे

परभणी जिल्हा आर्य वैश्य महासभेच्या संम्पन्न झालेल्या नूतन कार्यकारिणी च्या बिनविरोध निवडी संम्पन्न झाल्या अध्यक्षपदी हरिष कत्रूवार, सचिव आशिष पेकम, कोषाध्यक्ष सुशील मेडेवार कार्याध्यक्ष स्वप्नील पद्ममवार, यांच्या सह सर्व कार्यकारिणी ची सर्वस्ममतीने बिनवरोध निवड जाहीर करण्यात आली परभणी येथील मेडिकल असोसिएशन च्या सभागृहात परभणी जिल्हा आर्य वैश्य महासभेच्या जिल्हा कार्यकारिणीची पुढील तीन वर्षा करिता राज्य उपाध्यक्ष सुधीर आण्णा पाटील, यांच्या अध्यक्षतेखाली महासभेचे समन्व्यक राज्य संघटक प्रदीप कोकडवार, राज्य कार्य सदस्य रमेश पेकम, सखाराम चिद्रवार, सुनिल डाके, यांच्या उपस्थितित सर्व सम्मतीने बिनविरोध निवड करण्यात आली प्रथम श्री वासवी माता श्री रंगनाथ महाराज परभणीकर गुरुजी यांच्या प्रतिमेचे पूजन करून दीप प्रज्वलन करून सुरवात करण्यात आली उर्वरित पदाधिकारी उपाध्यक्ष गजानन कोकडवार जिंतूर प्रसाद दमकोंडे परभणी ज्ञानेश्वर आय्या गंगाखेड पांडुरंग रुद्रवार पालम राजीव पामे पाथरी दिलीप सतभाई सोनपेठ मोहन कोत्तावार सेलू वसंत पांम्पटवार पूर्णा सह सचिव शिरूष मुक्तावार महेश बासटवार, बालाजी माणिकवार स्वप्नील येरमावार केदार वलसेटवार विकास गादेवार सहकोषाध्यक्ष गजानन चिद्रवार अनिल कवटीकवार ज्ञानेश्वर डाके गणेश रुद्रवार सागर वट्टमवार आकाश फ टाणे दिलीप रुद्रवार प्रोजेक्त चेअरमन विराज वट्टमवार भूषण झरकर प्रसिद्धी प्रमुख महेश कोकड डॉ सचिन चिद्रवार प्रभाकर रेवणवार संघटन प्रमुख नारायण रेवणवार योगेश मेडेवार,विधी सल्लगार अँड बिपीन पेकम यांची तर सलागार म्हणून नितीन वट्टमवार संजय कोकडवार राजेश्वर कक्तृवार विशेष निमंत्रीत विकास वट्टमवार कृष्णा पद्ममवार डॉ रितेश वट्टमवार यांच्या निवड प्रक्रियेत सर्व जिल्ह्यातील सभासद आणि समाज बांधवांनी मोठा प्रतिसाद दिला परभणी जिल्हा पूर्व अध्यक्ष बालाजी डुब्बेवार यांनी हरिश कत्रूवार यांचे नाव सुचवले सचिव पदासाठी आशिष पेकम यांचे सुहास नळदकर यांनी तर सुशील मेडेवार यांचे नारायण रेवणवार यांनी सुचविले सर्व तालुक्याला उपाध्यक्ष सहसचिव सह कोषाध्यक्ष जिल्हा कार्यकारिणी सदस्य असे प्राधान्य देण्यात आले राज्या प्रमाणे जिल्ह्यात पण सर्व संमतीने बिनविरोध निवडी अत्यन्त खेळीमेळीच्या वातावरणात संम्पन्न झाल्या. वरील मान्यवरासह काशी अन्नपूर्णा सत्रम संस्थेवर सचिव म्हणून निवड झालेले ज्ञानेश्वर पेकम आणि राज्यस्तरावर बांधकाम समितीवर निवड झालेल्या किरण वट्टमवार विशाल



नारलेवार संदीप नळदकर सूत्रसंचलन संस्कृती पद्ममवार तर आभार रुद्रवार यांनी मानले

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com